# कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांच्या सर्वांसाठी लोकोपयोगी शिक्षण योजनेचा प्रयोग

**डॉ.एन.बी. पोहकर,** राज्यशास्त्र विभाग नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ ता. औंढा नागनाथ, जि परभणी

**प्रस्तावना:**

महात्मा जोतिराव फुले यांनी शिक्षणहेसमाजोन्नतीचे आणि समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे.शोषणमुक्त व भयमुक्त समाजनिर्मीती शिक्षणाच्या माध्यमातूनकरता येते.समाजात मानवी मुल्यांची पेरणी शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही.समाजाला आपल्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव शिक्षणातूनहोते असेस्पष्टकेले.म. फुलेचांच वारसा राजर्षी शाहू महाराजांनी पुढे चालविला. समतेवर आधारीत समाजव्यवस्था निर्मीतीसाठी शिक्षणप्रसारहे शाहू महाराजांचे शैक्षणिक तत्वज्ञान होते. शिक्षणाशिवाय राज्याची प्रगती नाही असेसांगून आपल्या संस्थानात वेगवेगळे शैक्षणिक धोरणे आखून शाहू महाराजांनी प्रत्यक्षात अंमलबजावणी केली.शाहूपूर्वकालीन शिक्षणव्यवस्था समाजातील वरिष्ठ वर्गीयासाठी निर्माण केलीहोती.दलित आणि समाजातील एकूण स्त्रिया शिक्षणापासून दूरहोत्या.शाहू महाराजांनी सर्वप्रथम शिक्षण व्यवस्था बहुजनांसाठी खुलीकेली.गावागावांत शाळा उघडल्यातसेच सर्वधर्मीयांसाठी शिक्षण घेण्यासाठी वसतीगृहाची सोयकेली.संस्थानातील सर्व सोयीमुळेसमाजातील बहुजन शिक्षण प्रवाहात आला.राज्यासाठीसुजान नागरिक निर्माण करण्यासाठी शिक्षणच महत्वाचे आहेहे शाहू महाराजांनी ओळखलेहोते.म्हणूनत्यांनी१९१७ साली प्राथमिक शिक्षणसक्तीचाकायदाकेला.शिक्षणाशिवाय राष्ट्राचा विकास होणार नाहीहे शाहू महाराज ओळखूनहोते.शाहू महाराजांच्या शिक्षणाचे महत्व त्यावेळी समाजाला पटलेहोते. आजही शिक्षणाशिवाय कोणताही देश, समाज पुढे जाणार नाही.

**शाहू महाराजांच्या शिक्षण योजनेचे उद्देश:-**

१) सर्वांसाठी शिक्षण देवून समाजाचा शैक्षणिक विकास साधने.
२) राज्यासाठी शिक्षणातूनकार्यक्षम नौकर वर्ग निर्माण करणे.
३) सर्वांसाठी शिक्षण योजना निर्माण करुन राज्यात राष्ट्रीय एकात्मता वाढीला लावणे.

**गृहितक:-**

१) शिक्षणामुळे समाजात आत्मनिर्भरपणा, स्वाभीमान आणि प्रगतीच्या पाऊलखुणा दिसून येतात.
२) शिक्षणामुळे विकासाला चालना मिळून राज्याची प्रगतीहोते.
३) शाहू महाराजांच्या शिक्षणामुळेसमाजातीलसाक्षरतेचे प्रमाण वाढले.

**शाहू महाराजांची शिक्षण योजना:-**

शाहू महाराजांनी १९१८ साली संस्थानात शिक्षणासाठीखर्चाचीतरतूदकरण्यासाठी 'खास शिक्षणकर' लावला.ता शिक्षणकर आजही लागू आहे.संस्थानातील शिक्षककार्यक्षमहोण्यासाठी त्यांना प्रशिक्षणाचीसोयकरण्यात आली.शिक्षकांना शिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेवून स्वतंत्र शिक्षक प्रशिक्षणकेंद्र दि. १५/०५/१९१२ सालीकाढण्यात आले.त्यामधून शिक्षकांना प्रशिक्षीत करण्यात आले.राज्यातील शिक्षक कौशल्यपूर्ण असल्याशिवाय विद्यार्थी परिपूर्णहोत नाहीतहे शाहू महाराजांनी ओळखलेहोते. आजही शाहू महाराजांचा शिक्षण प्रशिक्षणकार्यक्रम महाराष्ट्र शासन राबवत आहे. सरकारकडून डी.एड., बी.एड., एम.एड., महाविद्यालये चालवून तेथूनप्रशिक्षित शिक्षक निर्माण केले जात आहेत.

छत्रपती शाहू महाराजांनी प्रत्येक गावात शाळा स्थिरकरण्यासाठी 'वतनी शिक्षक' नियुक्त करण्याचा १९१२ ला आदेश काढला.पुढे वतनी शिक्षक मुलांनाकार्यक्षमपणे शिक्षण देत नसल्याचे दिसून आले.त्यामुळे शाहू महाराजांनी पगारी शिक्षकांची नियुक्तीकेली.वतनी शिक्षकाला वर्षासाठी वतना मार्फत मोबदला दिला जात असे.शाहू महाराजांनीसंस्थानामार्फत दर महिन्याला पगारी शिक्षक योजना सर्वप्रथम आपल्या राज्यात सुरु केली.शिक्षकाच्या उदरनिर्वाहासाठी त्यावेळी योजना फायद्याची होती. आजही महत्वाची आहेतसेच यानंतरही फायद्याची असणार आहे.

बहुजनांच्या सर्वांगीण उन्नतीचा मूलमंत्र शिक्षणहाच आहे यावर राजर्षी शाहू महाराजांची नितांत श्रध्दाहोती.सुशिक्षित माणूस म्हणजे निव्वळ पुस्तकी पंडीत नव्हे, तर शिक्षणाने माणूस शहाणा आणि कर्तव्यनिष्ठ झाला पाहीजे.वेगवेगळ्या क्षेत्रात माणूस तज्ञ झाला पाहिजे असा विचार शाहू महाराजांनी मांडला.ज्याला ज्या व्यवसायात यश मिळवायचे आहे, त्याला त्या विषयातील पुस्तके वाचता आली पाहिजेत व ती समजली पाहिजेत.त्याचे उपयोजन झाले पाहिजे असे शाहू महाराज म्हणत असत.त्यांचे त्या काळातील विचार शासकीय ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून आज राबविले जात आहेत.गाव तिथे ग्रंथालय अशी भुमिका घेवून शासनाकडून ग्रंथालयाला अनुदान दिले जात आहे.

शाहू महाराजांनी शुद्रातिशूद्रांच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नास त्यांनी प्राधान्य दिले. वसतीगृहे उभारुन प्राथमिक शिक्षणसक्तीचे व मोफत करुन दलित समाजाला लोकशाहीच्या प्रवाहात आणले. अठरा-पगड जातींमध्ये विद्याप्रसार करण्यामागील आपली भूमिका विशद करतांना राजर्षी शाहू महाराज म्हणतात, "समाजातील थोडासा भाग पूर्णसुशिक्षितहोण्यापेक्षा सर्व समाजाला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असेत्यांचे मत होते. रयतेतील मोठा भाग पूर्ण सुशिक्षीत होण्यापेक्षा सर्व समाजाला प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे असेत्यांचे मत होते.रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला व थोडेसे लोक विद्याचार संपन्न झाले व प्रजेस अधिकार

दिलेतर ते या थोड्या लोकांच्या हाती पडणार व एक 'स्वदेशी ब्युरोक्रसी' तयारहोणार. या सुशिक्षित ब्युरोक्रसीचा कारभार विशिष्ठ लोकांकरीताहोईल असे शाहू महाराजांना वाटत होते. याकरीता सर्व लोकांत विद्याप्रसार करण्यासाठी लक्ष देणे गरजेचे आहे."यावरुन राज्यासाठी सर्व लोकांच्या शिक्षणाचा आग्रह शाहू महाराजांनी धरला होता.

सामाजिक पुनर्बांधनी योग्य दिशेने व्हावी यासाठी सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण शाहू महाराजांनी केले.यासाठी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात जो आदेशकाढलातो महत्वपूर्ण आहे.

"शिक्षणास योग्य वयाच्या मुलांची यादी प्रसिध्द झाल्यापासूनतीन दिवसांच्या आत मुलांच्या आई-बापांनी आपापली मुले शाळेत पाठवावीत.अशा यादीविरुध्द कोणास अपील करावयाचे असल्यास त्यानेतीस दिवसांच्या आत ते करावे." शाळेत येण्याच्या ठरलेल्या तारखेपासून सात दिवसाच्या आत ती मुले जर शाळेत आली नाहीततर अशा मुलांची नावे व त्यांच्या पालकांची नावे त्या शाळेच्या हेडमास्तराने मामलेदार यांना कळवावीत. मामलेदाराने पालकांना अशा मुलांचे समन्स काढावेत.त्यांचे म्हणणे ऐकूण घ्यावे.म्हणणेसंयुक्तीक न दिसल्यास प्रत्येक मुलांबद्दल एक रुपया दंड करावा.हा दंड मुले शाळेत येईपर्यंत प्रत्येक महिन्यास आकारावा.आई-वडीलांच्या निकडीच्या शेती वगैरे कामासाठी मुलाच्या मदतीची जरुरी असल्यास पंधरा दिवस मुलास घरी ठेवून घेता येईल. पण त्यांचीसकारण दखलगिरी शाळा मास्तरास दिली पाहिजे.मुलेहजर राहण्याबाबत हेळसांड करु लागल्यास व अशा वेळी आई वडीलांचा दोष असेलतर पहिल्या प्रसंगी दोन आणे दंड करावा, पुढील प्रत्येक प्रसंगी एक रुपयांपर्यंत दंड करावा.

**निष्कर्ष:-**

अशा प्रकारे शासकीय जाहिरनामाकाढून शाहू महाराजांनी आपल्या नवविचारांना कृतिशीलतेची जोड देऊन शिक्षणहेसमाजातील सर्वसामान्यापर्यंत नेऊन पोहोचविले.शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार आजही फायद्याचे आहेत.त्यावेळी समाजातील बहुजनाला शिक्षणाचा फायदा झाला होता आजहीहोत आहे. सन १८९४ साली संस्थानात ८००८ विद्यार्थी शिक्षण घेत होते. १९२२ सालीते २१०२७ झालेतर आज २०१७ ला महाराष्ट्रात २० लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.शाळेची संख्या ७२०६३ आहे.तंत्रनिकेतन शाळेची संख्या ३२४ आहेतर महाराष्ट्रात उच्च शिक्षण देण्यासाठी १२ विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनानेकेली आहे.

शाहू महाराजांनीकोल्हापूर संस्थानात अस्पृश्य विद्यार्थ्यांना विशेष प्रोत्साहन व आर्थिक मदत म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या.या शिष्यवृत्त्या दिल्या.या शिष्यवृत्त्या शाहू महाराजांनी आपल्या खाजगी पैशातून पुढे चालू ठेवल्या होत्या. राजर्षी शाहू महाराजांनी आपले व्दितीय पुत्र शिवाजी महाराज यांच्या स्मरणात दहाहजार रुपयाची रक्कमहुजूरकोषागारात ठेवली व या रक्कमेवर मिळालेल्या व्याजातून दरमहा अस्पृश्य विद्यार्थ्यांना पाच रुपये महिन्याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्याचा ठराव मंजूरकेला. गरीब विद्यार्थी शिक्षण घेवू शकत नाहीत त्यांना शिक्षणासाठी आधार म्हणून शिष्यवृत्ती योजना शाहू महाराजांनी सुरु केली. या त्यांच्या शिष्यवृत्तीचा फार मोठा आधार घेवून गरीब विद्यार्थी स्वतःचे शिक्षण पूर्ण करुन स्वतःच्या पायावर उभे राहिले. त्यावेळी शिष्यवृत्ती गरजेची होती आजही शिष्यवृत्तीच्या माध्यमातून गरीब विद्यार्थी पुढे जात आहेत असे दिसून येते.

**ग्रंथसूची:-**


१) जाधव आर., १९९७, लोकराजा, सुरेश एजन्सी पूणे
२) लट्ठे ए.बी., १९९४, द मेमाईर्स ऑफ हिजहायनेस, श्री शाहू छत्रपती ऑनर्स प्रकाशन, कोल्हापुर
३) कुलकर्णी ए. व खरे जी., २००६, मराठ्यांचा इतिहास, विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ पुणे.
४) कौंडेकर आर., २००१, रयतेचा राजा राजश्री शाहू महाराज, अरुणा प्रकाशन, लातुर.
५) पवार जे., २००१, राजर्षी शाहूस्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापुर.
६) मंगल के.टी., २००६, समाजशास्त्रज्ञ राजर्षी शाहू, जनराज ऑफसेट, कोल्हापुर.
७) मोरे जी., २००९, राजर्षी शाहु विचार व कार्य, निर्मीती विचार मंच कोल्हापुर.
८) कडवे आर., २००४, लोकराजा शाहू छत्रपती, शशी प्रकाशन, वर्धा.